# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
यांचेकार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणेदुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्र-३४२/२०२४** **दिनांक-०५/०९/२०२४.**

## "एक महिला वेश्यादलाल ताब्यात घेवून दोन पिडीत महिलांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांना यश"

दिनांक ०३/०९/२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष नालासोपारा यांना बातमीदारांकडून खात्रीशिर बातमी मिळाली की, महिला नामे **हिना सलाउद्दीन खान**, ही नालासोपारा पुर्व, अग्रवाल येथे वेश्याव्यवसाय करीत असून तिचे मोबाईल क्रमांकावर पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला की, व्हाटॲपव्दारे पुरुष गिऱ्हाईकांना फोटो पाठवून पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी गिऱ्हाईकांना मुली पुरवीतात अशी माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावून वेश्यादलाल **हिना सलाउद्दीन खान** यांनी सांगितल्या प्रमाणे मसाज स्पा चे गाळा नं. ८,९ महावीर अपार्टमेंट अग्रवाल फायरब्रिगेड, नालासोपारा पुर्व या ठिकाणी बोगस गिऱ्हाईक पाठवून सत्यता पडताळून १४:५७ वा. छापा टाकला असता. यातील महिला **हिना सलाउद्दीन खान, रा. शिफा अर्पा.रुम नं. २०२, सितारा बेकरी जवळ नगिनदासपाडा नालासोपारा पुर्व**, हिने ०२ पिडीत महिलांना वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमानाची रक्कम ठरवून स्वतःच्या उपजिविके करीता रक्कम वेश्यादलाल **हिना सलाउद्दीन खान** हिने स्विकाल्याने त्यांना साफळयातील रोख रक्कम ४५००/- रुपये ताब्यात घेवून ०२ पिडीत महिलांची सुटका केली आहे. सदर बाबत ताब्यातील महिला वेश्यादलाल **हिना सलाउद्दीन खान**, हिच्या विरुध्द मपोअंम/काजल पाटील यांनी सरकारतर्फे आचोळे पोलीस ठाणे येथे फिर्याद दिल्याने आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नं. ३५६/२०२४, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १४३ (३), सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे दिनांक ०४/०९/२०२४ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा), यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा, नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार व सफौ/गवई, पोहवा/किणी, पोहवा/शेटये, मपोहवा/डोईफोडे, चालक पोहवा/पागी, मपोहवा/तिवले, पोहवा/शिंदे, मपोशि/पाटील सर्व नेम.अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्ठरित्या कामगीरी पार पाडली आहे.

-----------ooooo---------